जाक्रमाध्य-३[१४]नुतनीकरण/पुवि/९५/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक :- 5 DEC 1995

प्रति,

शिक्षणाधिकारी [ माध्यमिक ]
जिल्हा परिषद, पुणे.

विषय:- सन १९९४-९५ यावर्षी परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळेच्या आदेशाचे १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरण करण्याबाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्र. एसएसएन-१०९५/५८४७/माशि-७ दिनांक १८.११.९५.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय शासन पत्रान्वये कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून मराठी माध्यमाची नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली होती. तथापि परवानगी आदेश उशिरा मिळाल्याने आणि विद्यार्थी संख्येअभावी त्यावर्षी शाळा सुरु करता आली नाही. याबाबत संस्थेने केलेली विनंती विचारात घेऊन सदर संस्थेस १९९४-९५ यावर्षी माध्यमिक शाळा सुरु करण्यास दिलेल्या परवानगी आदेशाचे नुतनीकरण करुन "जुन १९९४" ऐवजी "जुन १९९५" पासून त्याच ठिकाणी मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासन पत्र क्र. एसएसएन-१०९४/५११५/माशि-१, दिनांक २.११.९४ च्या पत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या शर्तीवर संदर्भिय आदेशान्वये परवानगी देण्यात आली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम | सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात परवानगी दिलेल्या शासन पत्राचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १] | साने गुरुजी शिक्षण संस्था, हडपसर जि. पुणे. | हडपसर परिसर, पुणे | मराठी | एसएसएन-१०९४/५११५/माशि-१, दि. २.११.९४ |

तरी याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करुन संबंधित संस्थेस तात्काळ कळविण्यात यावे.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

प्रत माहितीस्तव:-

१] मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२ यांना सविनय सादर.

२] मा. शिक्षण संचालक, म. रा. पुणे १ यांना सविनय सादर.

३] सचिव, साने गुरुजी शिक्षण संस्था, महंमद वाडी रोड, हडपसर, पुणे - २८.